महाराष्ट्र टाइम्स
www.maharashtratimes.com

पुणे ■ मंगळवार, २४ जानेवारी २०१२

# रिकामी बाटली द्या अन् दोन रुपये घ्या

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

## रायगडावरील प्लॅस्टिक कमी करण्यासाठी उपक्रम



रायगडावरील कचरा कमी करण्यासाठी 'आपल्याकडील रिकामी पाण्याची बाटली द्या आणि दोन रुपये मिळवा, आमच्याकडून घेतलेली पाण्याची बाटली द्या आणि चार रुपये मिळवा' असा हा अनोखा सप्ताह राबविण्याचा निर्णय रायगड रोप वे संस्थेने घेतला आणि पहिल्याच दिवशी तब्बल पाच हजार पाण्याच्या बाटल्या जमा झाल्यात. प्लॅस्टिकचे हे प्रमाण पाहून संस्थेसह गडावरील व्यावसायिकांनाही धक्का बसला आहे.

शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगडाला प्लॅस्टिक पाण्याच्या बाटल्यांपासून मुक्त करण्यासाठी 'रायगड रोप वे' तर्फे 'निसर्गावर प्रेम करा' सप्ताह राबविण्यात येत आहे. दोन दिवसांपूर्वीच या उपक्रमाला सुरुवात झाली.

याबाबत माहिती देताना रायगड रोप वे मुख्यकार्यकारी अधिकारी कर्नल व्ही.के.एस. बेडेकर म्हणाले, 'प्लॅस्टिक कचरा हा गडावरील गंभीर प्रश्न झाला असून त्यावर तातडीने उपाय राबविणे आवश्यक आहे. संस्थेतर्फे सध्या प्रायोगिक तत्वावर हा उपक्रम राबविण्यात येतो आहे. प्लॅस्टिकच्या बाटल्या इतरत्र फेकून देण्याऐवज़ी नागरिकांनी परत दुकानात द्याव्यात, यासाठी आम्ही दोन रुपये परत देण्याचा निर्णय घेतला. पण, धक्कादायक बाब म्हणजे पहिल्याच दिवशी पाच हजार बाटल्या जमा झाल्या. यावरुन कचऱ्याचा आवाका लक्षात येतो. एवढेच नव्हे तर आमच्या दुकानात अनेक पर्यटक बिस्किटे विकत घेतात, पण त्यांच्या रॅपर्समुळेही कचरा होऊ शकतो म्हणून आम्ही कागदी पाकिटात बिस्किटे देण्यास सुरुवात केली आहे. गिऱ्हाईक आल्यावर आम्ही प्लॅस्टिकच्या कचऱ्याचे गांभीर्य सांगून ती बिस्किटे कागदी पिशवीत पॅक करुन देतो. त्यामुळे रॅपर्स इतरत्र पडत नाहीत.'